.

Priyraj Dr. Priyraj Maheshkar Maheshkar

To cite this version:

Priyraj Dr. Priyraj Maheshkar Maheshkar. . . Equality, Social Justice and Women Empowerment, Oct 2012, Nagpur, India. hprints-03384764

HAL Id: hprints-03384764
https://hal-hprints.archives-ouvertes.fr/hprints-03384764v1

Submitted on 19 Oct 2021

**HAL** is a multi-disciplinary open access archive for the deposit and dissemination of scientific research documents, whether they are published or not. The documents may come from teaching and research institutions in France or abroad, or from public or private research centers.

L'archive ouverte pluridisciplinaire **HAL**, est destinée au dépôt et à la diffusion de documents scientifiques de niveau recherche, publiés ou non, émanant des établissements d'enseignement et de recherche français ou étrangers, des laboratoires publics ou privés.

# EQUALITY SOCIAL JUSTICE & WOMEN EMPOWERMENT



Editor

Pradeep Hadke

# Equality, Social Justice & Women Empowerment

Editor : Pradeep Hadke

**Published by :**

**Sanjog Tupe,** *General Secretary*
**Dr. Ambedkar Teachers' Welfare Association**
4/1 MIG Colony, Wanjari Nagar, Nagpur
Email : ambedkarteachers@rediffmail.com Tel. 0712-2750200

**Copyright©**
All rights reserved.
No part of this publication may be reproduced stored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise with the prior permission of the Editor of the Conference Proceedings.

The papers included in this publication have been directly reproduced with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. The responsibility for facts states, opinions, expressed or conclusion reached and plagiarism if any, in this book is entirely that of the authors/contributors. The Editor, Advisory Committee, Editorial Board, Members & Office Bearers of Dr. Ambedkar Teachers' Welfare Association and Printer bears no responsibility for them; whatsoever. In case of any dispute all legal matter are to be settle under Nagpur Jurisdiction only

**Edition : 2012**

**ISBN 978-81-925424-0-9**

***Typesetting & Printed by***
**Dinesh Graphic**
Trimurti Nagar, Nagpur-440 022
M. 9422119631/9765762211

# CONTENTS

## ENGLISH SECTION

1. *Relevance of Dr. Ambedkar's Interpretation of Buddhism* ........ 1
*Pradeep P. Gokhale*

2. *Constitutional Social Justice and Buddhist Welfare State* ........ 13
*M. S. Wankhede*

3. *The Testimony of Dalit Autobiographies: A Human Rights Perspective in the Light of Ambedkarite Philosophy* ........ 19
*Vandana Pathak*

4. *National Policy for Economic Empowerment of Women in India* ........ 23
*Surendra R. Jichkar*

5. *Dr. Ambedkar's Thought on Equality* ........ 26
*Nimba Ram*

6. *Dr. Ambedkar's Thought on Women Empowerment* ........ 28
*Bhagyashree Kailasrao Athwale*

7. *Right to Equality as Viewed in the Constitution of India* ........ 31
*Kamlakar K. Askar*

8. *Dr. B. R. Ambedkar's Thought on Human rights* ........ 34
*Vivek Vithalrao Jawale*

9. *The World Class Economist : Dr. B. R. Ambedkar* ........ 37
*Ekurkekar Balaji Madhukar*

10. *Media, Indian National Spirit and Dr Ambedkar : Few Stray Thoughts* ........ 40
*Dharmesh Dhawankar*

11. *Dr. Ambedkar's thought on Higher Education* ........ 43
*Asha Tiwari*

12. *Economic Thought of Dr. B. R. Ambedkar* ........ 47
*M. R. Ingle*

13. *Vanguard of Human Rights Dr. Babasaheb Ambedkar. A Great Constitutional Philosopher* ........ 50
*Rajendra S. Motghare*

14. *Dr. Ambedkar's Views on Buddhism and it's Relevance to the Present World* ........ 55
*Prakash D. Wankar*

15. *Gender Inequality and Caste : A Sociological Perspective* ........ 58
*Dhananjay K. Sontakke*

16. *Dr. B.R. Ambedkar's Movement for Human Rights and Discrimination* ........ 61
*O. P. Chimankar, Nalini Tembhekar Chimankar*

17. *Contribution Dr. Ambedkar In the Upliftment of Disadvantageged Through Education* ........ 65
*Khobragade Grishma Manikrao*

18. *Application of Constitutional Amendment to Enact Affirmative Action in Private Sectors* ........ 68
*Pradeep Hadke*

19. *Dr. Ambedkar and Women Empowerment* ........ 72
*C.K.Jiwane*

97. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार ..... 307
वि्. एम. घुबळे
98. डॉ. आंबेडकरांचे समता विषयक विचार ..... 309
नभा हर्षवर्धन कांबळे
99. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार ..... 311
गजानन सोमकुंवर
100. डॉ. अम्बेडकरांचे समानता विषयक विचार ..... 313
अलका अ. बडगे
101. भारतीय समाजातील वर्गीनिहाय असमानता ..... 316
विशाखा के. मानकर
102. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : समानतेचे जनक ..... 319
पुरूषोत्तम गुणवंतराव पखाले
103. महिला सशक्तीकरणासंबधी डॉ आंबेडकराचे विचार ..... 322
अरूणा थूल
104. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार ..... 326
नरेन्द्र के. पाटील
105. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारातील समाता मूल्य ..... 328
रमेश काशिराम शेंडे
106. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे उच्च शिक्षणावरील विचार : आधुनिक काळाची गरज ..... 330
माधुरी प्र. पाटील, प्रशांत एम. पाटील
107. बौध्द धम्म आणि विश्वशांती ..... 333
रमेश एम. घोनमोडे
108. सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि मानवी हक्क यावर डॉ. आंबेडकर यांचे विचार ..... 336
सुनिल एम. तोतडे
109. महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान ..... 339
प्रज्ञा कामडी
110. लिंगभाव भेद आणि भारतीय समाज ..... 341
सुशमा बागेश्वर
111. भगवान बुद्ध यांचे सामाजिक व आर्थिक विचार ..... 343
प्रविण कोहळे
112. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद ..... 346
प्रियराज महेशकर
113. डॉ. आंबेडकर आणि मानवाधिकार ..... 349
अरविंद बा. घोंगडे
114. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन ..... 352
सुधाकर सोनोने
115. महिला सशक्तीकरणावर डॉ. आंबेडकरांचे विचार ..... 355
मनोज पवार, प्रशांत देशमुख
116. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक विचार ..... 357
मनोहर रामचंद्र चौधरी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद

**प्रियराज महेशकर**
इतिहास विभाग प्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा

"Dr. Ambedkar is a Patriot of Sterling Qualities" - Mahatma Gandhi

इ. स. १८८५ मध्ये इंग्रज अधिकारी ए. ओ. हयूम यांनी भारतीय राष्ट्रीय सभेची (कॉंग्रेस) स्थापना केल्यानंतर भारतातील राष्ट्रीय चळवळ संघटितपणे सुरु झाली. पुढे विसाव्या शतकात बंगालच्या फाळणीनंतर (१९०५) ती अधिक गतिमान झाली. त्यामध्ये तत्कालिन प्रमुख नेत्यांनी सहभाग घेतला, प्रसंगी तुरुंगवास भोगला. या दृष्टीने पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तथाकथित स्वातंत्र्य चळवळीत सक्रीयपणे सहभागी झालेले दिसत नाहीत उलट स्वातंत्र्य चळवळीचे शीर्षस्थ महात्मा गांधीसोबत संघर्षरत दिसतात. यामुळे डॉ. आंबेडकर हे स्वातंत्र्याच्या विरोधी होते, ते राष्ट्रद्रोही होते असे चित्र डॉ. आंबेडकरांच्या संदर्भात निर्माण केले जाते. कारण ब्रिटीश विरोधी स्वातंत्र्य लढयात ज्यांनी ज्यांनी भाग घेतला तेच खरे देशभक्त असा सर्वसाधारणपणे भारतीयांचा समज आहे किंबहुना तसा तो करुन देण्यात आला आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात ए. सी. मुजुमदार, आर. जी. प्रधान, पट्टाभिसीतारामय्या, बी. आर. नंदा, विश्वेश्वर प्रसाद, अमलेश त्रिपाठी या सर्व इतिहासकारांच्या इतिहासलेखनातून राष्ट्रीय कॉंग्रेसची चळवळ म्हणजेच भारतातील एकमेव राष्ट्रवादी चळवळ होय, असे समीकरण पुढे आणले गेले.१ पुढे त्यांचीच रि छोटया मोठया इतिहास लेखकांनी विशेषतः पाठयपुस्तके लिहिणाऱ्या लेखकांनी ओढल्यामुळे इंग्रजांच्या विरुध्द प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढयात उतरलेलाच राष्ट्रभक्त हा समज (गैरसमज) सार्वत्रिकपणे रुढ झाला. उपरोक्त देशभक्तीची कॉंग्रेसकेंद्रीत व्याख्या बाजुला ठेवून वस्तुनिष्ठपणे विचार केला तर डॉ. आंबेडकर हे इतर कोणत्याही देशभक्त नेत्यापेक्षा काकणभर अधिकच देशभक्त असल्याचे निसंदिग्धपणे दिसून येते. त्यासाठी आपणास डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे स्वरुप नीट समजुन घ्यावे लागते. व त्यापुर्वी भारतात निर्माण करण्यात आलेला ब्राम्हणी राष्ट्रवाद लक्षात घ्यावा लागतो.

**भारतीय राष्ट्रवादाची ब्राम्हणी चौकट**

राष्ट्र या संकल्पनेतून राष्ट्रवाद ही संकल्पना पुढे येते. साधारणपणे एकाच भुप्रदेशावर राहणाऱ्या व त्यातुन परस्परांबद्दल वाटणाऱ्या आपुलकीच्या भावनेतुन निर्माण होणारी एकत्वाची भावना म्हणजे राष्ट्र होय. या राष्ट्राबद्दल व्यक्तीच्या मनात असलेले प्रेम, जिव्हाळा व राष्ट्रासाठी त्याग व बलिदान करावयची असलेली मानसिक भावना म्हणजे राष्ट्रवाद होय असे ढोबळपणे म्हणता येईल.[२] राष्ट्रवादही एक आधुनिक संकल्पना होय. ती युरोपियन देशांमध्ये रुजण्यासाठी पाचशे वर्षे गेली. पुढे युरोपियन साम्राज्यवादासोबतच ती जगातील इतर देशांमध्ये पसरली. ब्रिटीशांसोबत ती भारतात आली. त्यावेळी भारतात सर्वप्रथम इंग्लीश विद्याविभूषित झालेल्या मध्यमवर्गीय ब्राम्हण बुध्दीजीवींनी राष्ट्र व राष्ट्रवाद या संकल्पनांचे आपल्या सोईने ब्राम्हणीकरण केले. वसाहतवाद्यांनी भारताविषयी निर्माण केलेली ज्ञानसामुग्री व ब्राम्हणी परंपरेतील ज्ञानसामुग्रीचा उपयोग करुन ब्राम्हण जात अस्मितेशी सुसंगत अशा इतिहास व संस्कृतीच्या अधिष्ठानावर भारताच्या राष्ट्रकल्पनेची उभारणी करण्यात आली. त्यांनी भारतीय इतिहासातील जैन, बौध्द व त्यासारख्या इतर धर्मांच्या विद्रोहाकडे दुर्लक्ष करीत भारताच्या राष्ट्रीयत्वाचा आधार केवळ आर्यांच्या वैदिक ब्राम्हणी संस्कृतीपासून प्राप्त केला. ब्राम्हणकेंद्री हिंदू इतिहास राष्ट्र अस्मितेचा स्त्रोत बनवला. भारतातील जातिसंघर्ष लपवून ब्राम्हण केंद्री संस्कृती विचार दृढ केला. हिंदू समाज म्हणजेच राष्ट्रीय समाज व हिंदू इतिहास आणि संस्कृती यांनी बनलेले हिंदू राष्ट्र म्हणजेच भारतीय राष्ट्र अशी कल्पना तयार केली गेली.[४] राष्ट्रवादाला ब्राम्हणवादामधून तयार झालेल्या सांस्तिक एकतेच्या अधिष्ठानावर उभे करण्यात आले. दादोबा पांडुरंग, आगरकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी, दयानंद सरस्वती, चिपळूणकर, टिळक इत्यादींनी ब्राम्हणी राष्ट्रवादाला आकार देण्यात वाटा उचलला.[५]

**फुले आंबेडकरांचा राष्ट्रवाद**

भारत हे राष्ट्र आहेच हे ब्राम्हणी राष्ट्रवादाचे गृहितक महात्मा फुले यांना मान्य नव्हत राष्ट्र म्हणजे शएकमय लोकश अशी त्यांची राष्ट्राची व्याख्या होती. पण भारतातील लोक हे जाति-जातिमध्ये विभागल्या गेल्यामुळे त्यांच्यात एकमय नाही त्यामुळे जातिव्यवस्थेच्या अंतातुनच भारतात राष्ट्रवादाची निर्मिती होवू शकेल असे फुल्यांचे मत होते. बळीस्थानातील एकंदर शुद्रादी अतिशुद्रासह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होवून विचार करण्यालायक होईतो पावेतो ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय छंजपवद होऊ शकत नाही.[६] असे महात्मा फुले यांनी स्पष्ट केले होते.

महात्मा फुले यांना गुरु मानणाऱ्या डॉ. आंबेडकरांचे राष्ट्र व राष्ट्रवादासंबंधीचे मत हे फुल्यांप्रमाणेच होते. त्यांनी ते वेळोवेळी आपल्या लिखाण व भाषणांमधून व्यक्त केले होते. घटना समितीसमोर भाषण करतांनाही ते पुढील प्रमाणे व्यक्त झाले होते. आपण राष्ट्र आहोत असे समजुन आपण एक भ्रमाच्या मागे लागलो आहोत. कित्येक हजारो जातिंमध्ये विभागले गेलेले लोक राष्ट्र कसे होऊ शकतात? सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टीने आपण अजुनही राष्ट्र झालेलो नाही. हे आपण जितक्या लवकर समजु तेवढे आपल्यासाठी बरे आहे. खरे तर तेव्हांच आपण राष्ट्र बनण्याची गरज समजु शकू व ते लक्ष प्राप्त करण्यासाठी गांभीर्याने विचार करु शकू.[७] थोडक्यात डॉ. आंबेडकरांच्या मते राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव. जात, वर्ण आणि संप्रदाय यांच्याशिवाय सामाजिक बंधुभाव प्रत्यक्षात आणणे आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवाद होय.[८]

ISBN 978-81-925424-0-9

भारतातील जातिव्यवस्थेने हजारो वर्षांपासून सामाजिक गुलामगिरीत अडकविलेल्या बहुजन समाजाची जोपर्यंत मुक्तता होणार नाही तोपर्यंत भारत हे एक राष्ट्र म्हणून उभेच राहू शकणार नाही. अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. त्यांच्या राष्ट्रवादात मानवतावाद व लोकशाही अभिप्रेत होती. त्यांचा राष्ट्रवाद हा धर्म, जाती, वंश, पंथ, भौगोलिक रचना यांच्याही पलीकडे जाणारा होता. तो प्रस्थापित उच्चजातीय, उच्च मध्यमवर्गीय आणि पुरुषसत्ताक असणाऱ्या परंपरागत समाज व्यवस्थेला नाकारुन समतेवर आधारीत राष्ट्र निर्माण करण्यास उत्सुक व कटिबध्द होता.[९] यामुळे साहजिकच डॉ. आंबेडकरांचा प्राधान्यक्रम राजकीय स्वातंत्र्य लढयापेक्षा सामाजिक स्वातंत्र्य लढयाला होता. श्एकवेळ राजकीय स्वातंत्र्य मिळविणे सोपे आहे परंतु अस्पृश्यांची गुलामगिरीतुन मुक्तता करणे हजार पटीनी कठीण आहे.श असे त्यांचे मत होते.[१०] अस्पृश्योध्दार देशाच्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्वाचा होताच परंतु मानवतेच्या दृष्टीने देखील त्याचे महत्व जास्त असल्याने आंबेडकरांनी मानव मुक्तीच्या लढयाला प्राधान्य दिलेले दिसते.[११]

**देशाच्या स्वातंत्र्यापेक्षा जनतेचे स्वातंत्र्य महत्वाचे**

कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली उभा राहिलेला स्वातंत्र्य लढा हा एकांगी असल्याचे आंबेडकरांना वाटे. कारण कॉंग्रेस ही ब्राम्हणी राष्ट्रवादाच्या चौकटीत केवळ मुठभर उच्चवर्णीय व भांडवलदारांचे हितसंबंध जोपासण्यासाठी कार्यरत होती. दीनदलितांचे प्रश्न कॉंग्रेसच्या दृष्टीने दुय्यम होते. त्यामुळे डॉ. आंबेडकर कॉंग्रेसबद्दल साशंक होते. शीर्षक कोई भी हो किन्तु यह सन्देह से परे है की कॉंग्रेस, हिंदू पुंजीपतीयों द्वारा समर्थित, मध्यमवर्गीय हिंदूओ का एक संगठन है जिसका लक्ष्य भारतीयोंको स्वतंत्र बनाना नही है, बल्की ब्रिटीश नियंत्रण से मुक्त होना है ताकि सत्ता के उन स्थानों पर अधिपत्य हो जाये जिन पर अब अंग्रेज बैठे है।[१२]

यामुळेच डॉ. आंबेडकरांच्या मनात स्वातंत्र्य देशाचे की जनतेचे? असा प्रश्न उपस्थित होत होता. देश स्वतंत्र झाला तरी देशातील बहुजन जनता सामाजिक-धार्मिक व्यवस्थेची गुलामच राहिली असे त्यांचे मत होते. त्यामुळे साहजिकच त्यांचा अग्रक्रम देशाच्या स्वातंत्र्यापेक्षा जनतेच्या सामाजिक-धार्मिक स्वातंत्र्याला राहिला. तत्कालिन बहुसंख्याक समाज व त्यांचे पुढारी हे अस्पृश्यांच्या हितविरोधी होते. त्यांना साधे पिण्याच्या पाण्याचा हक्कही द्यायला ते तयार नव्हते. अशा अस्पृश्यांबद्दल निष्ठूर व क्रुर असणाऱ्या लोकांच्या हातात ब्रिटीशांनंतर सत्ता गेली तर त्यांना समतेचे हक्क मिळणार नाहीत. त्यामुळे ब्रिटीशांनी घाईने सत्तांतर न करता सर्व जातींना सत्तेत सहभागी करुन घेऊनच ते करावे यासाठी त्यांचा आग्रह होता. याच भूमिकेतून त्यांनी सायमन कमिशनला साक्ष दिली होती, याच भूमिकेतून त्यांनी गोलमेज परिषदांना हजेरी लावली होती. घटनात्मक मार्गाने अस्पृश्य जनतेच्या वाटयाला अधिकाधिक अधिकार पाडून घेता यावेत, त्यांचे प्रश्न सोडविता यावे याकरिताच ते ब्रिटीश कायदेमंडळात सामिल झाले होते.

**सच्चे देशभक्त डॉ. आंबेडकर**

एक सच्चे भारतीय म्हणून डॉ. आंबेडकरांचा ब्रिटीश साम्राज्यवादाला तीव्र विरोध होता. १९३२ मध्ये गोलमेज परिषदेत ब्रिटीशांनी भारत सोडून चालते व्हावे असे बजावणारे ते सर्वप्रथम भारतीय होत.[१३] सायमन कमिशनपुढे जातीय तत्वावर सिंध प्रातांच्या विभाजनाचा प्रश्न आला असता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेली भूमिका प्रखर राष्ट्रवादी होती. हिंदू मुसलमान यांच्यातील जातीय भावनांना भरती आली असतांना जातीय आधारावर प्रांतीय विभाजन करणे योग्य नव्हे. जेव्हा हिंदू मुसलमान यांच्यामध्ये आम्ही आधी भारतीय व शेवटीही भारतीयच अशी भावना निर्माण होईपर्यंत तरी वाट पाहावी. अशी राष्ट्रवादी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतली होती.[१४]

पनवेल जवळील चिरनेर या गावातील सत्याग्रहीवर सरकारने खटला भरला असता सत्याग्रहींचे वकीलपत्र डॉ. आंबेडकरांनी घेऊन सरकारच्या स्थैर्यापेक्षा जनतेचे न्याय्य हक्क आणि स्वातंत्र्य यानांच जास्त प्राधान्य द्यावेत अशी न्यायालयापुढे बाजू मांडली होती.[१५]

१९४२ मध्ये व्हॉईसरॉयच्या कार्यकारणीमध्ये ब्रिटीश सरकारने डॉ. आंबेडकरांचा समावेश केला. त्यावेळी त्यांनी मी हिंदू समाजाचा कट्टर टीकाकार आहे म्हणून ब्रिटीश सरकार माझा उपयोग भारतीय स्वातंत्र्याविरुध्द करील, पण मी हिंदू समाज आणि त्यांचे असंख्य सामाजिक दोष याविरुध्द जे टीकेचे प्रहार केले आहेत त्यापेक्षा शेकडो पटीने जहरी व हृदयभेदक टीकेचे प्रहार मी ब्रिटीश राज्यकर्त्यांवर करीन आणि माझ्या राज्यनिष्ठेच्या नावावर ब्रिटीश राज्यकर्ते अस्पृश्यांचा उपयोग आपले साम्राज्य स्थिर करण्यासाठी करणार असेल तर अस्पृश्यांना मी ब्रिटीशांच्या पाशवी पंजातून बाहेर काढीन.[१६] असे निवेदन जाहीर करुन ब्रिटीशांना इशारा दिला होता. त्यातुन त्यांची प्रखर राष्ट्रनिष्ठा प्रकट होते.

मुसलमानांच्या रोषाची पर्वा न करता डॉ. आंबेडकरांनी देशहिताला अग्रक्रम देत आपली मते परखडपणे मांडली. कॉंग्रेस व गांधीद्वारा सुरु असलेले मुस्लीम अनुनयाचे धोरण देशहिताच्या दृष्टीने आत्मघातकी ठरेल असे स्पष्टपणे सांगणारे डॉ. आंबेडकरच होते. हैद्राबादचा निजाम हा भारतीय स्वातंत्र्याचा विरोधी असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्यांना कोणत्याही परिस्थितीत कितीही संकटे आली तरी निजामाला साथ देऊ नका असे आवाहन केले होते.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधान निर्मितीच्या माध्यमातून अत्यंत मौल्यवान असे देशसेवेचे कार्य पार पाडणारे डॉ. आंबेडकरच होते. भारतीय समाजावर मनुस्मृतीद्वारा निर्मित विषमतावादी व्यवस्थेचा जबरदस्त पगडा होता, भारतीय समाज मानसिकदृष्टया प्रतिगामी व सनातन असा होता. अशा आधुनिकता विन्मुख भारतीय समाजाला संविधानाच्या माध्यमातून आधुनिकतेच्या सुत्रात आणण्याचे मोठे कार्य डॉ. आंबेडकरांनी पार पाडले. संविधानाची उद्देशिका जरी आपण नजरेखालून घातली तरी भारतीय समाजाला संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी किती मोठी आधुनिक मुल्ये दिली याची आपणास कल्पना येते. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावण्याची



ISBN 978-81-925424-0-9

आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करण्याची भूमिका संविधान स्पष्टपणे मांडते.[१७]

आपल्या आयुष्याच्या शेवटी डॉ. आंबेडकरांनी आपल्या पाच लाख अनुयायांच्या सोबतीने बौध्द धम्माचा स्वीकार केला. डॉ. आंबेडकर हे प्रखर राष्ट्रनिष्ठ भारतभुमीचे सुपुत्र असल्यामुळे आपण करीत असलेली धर्मांतरासारखी .ती ही आपल्या देशासाठी अडचणीची ठरु नये याची पुर्ण जाणीव व तशी प्रगल्भता डॉ. आंबेडकरांकडे होती. मी पाच वर्षात या देशाचे वाटोळे करु शकतो. परंतु मी तसे करणार नाही. भारताच्या इतिहासात देशाचा व धर्माचा विध्वंसक म्हणून माझ्या नावाची नोंद व्हावी अशी माझी इच्छा नाही. अशी त्यांची भावना होती. यामुळेच त्यांनी ख्रिश्चन किंवा मुस्लीम अशा भारताबाहेर उदय पावलेल्या धर्मांचा पर्याय नाकारात भारतात उदय पावलेला व भारतातूनच जगभर पसरलेला बौध्द धम्म स्वीकारला. त्यांच्या धर्मपरिवर्तनात विवेकाची, भारतीय राष्ट्रीयतेची व एकात्मतेची बीजे सामावलेली आहेत. डॉ. आंबेडकरांचे धम्मचक प्रवर्तन हे संविधानानंतर संविधानातील उद्दिष्टांना प्राणभूत करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने टाकलेले पुढचे पाऊल होते, हे स्पष्ट आहे.[१८]

राष्ट्रवाद ही एक आधुनिक संकल्पना असून ती भावनेशी निगडीत आहे. ब्रिटीशांसोबत ती भारतात आली व तिला तत्कालिन ब्राम्हण बुध्दीवाद्यांनी आर्यांच्या वैदिक संस्.तीच्या आधारावर हिंदूत्वाचा मुलामा देऊन उभे केले. त्याचा प्रतिवाद करीत फुले-आंबेडकरांनी भारतीय इतिहासातील जातिसंघर्ष उघड केला. जातिव्यवस्थेच्या अंतानंतरच भारतात राष्ट्रवादाची निर्मिती होऊ शकेल अशी भूमिका घेतली. शुद्रातिशुद्रांची धार्मिक व सामाजिक गुलामीतून मुक्तता करण्याला प्राधान्य दिले. पण तत्कालिन कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या स्वातंत्रता चळवळीचा प्राधान्यकम हा मुठभर उच्चवर्णीय व भांडवलदारांचेच हित असल्यामुळे डॉ. आंबेडकर कॉंग्रेसी चळवळीपासून दूर राहिले. त्यांच्या दृष्टीने देशाच्या स्वातंत्र्यापेक्षाही देशातील बहुजन-अस्पृश्य जनतेचे स्वातंत्र्यच महत्वाचे होते. ते प्राप्त करण्याकरिताच ते ब्रिटीश सत्तेच्या माध्यमातून पुढे आलेल्या सायमन कमिशन, गोलमेज परिषदा, व्हॉईसरॉयच्या कौन्सिलचे प्रतिनिधीत्व या संधींचा उपयोग करीत राहिले. पण डॉ. आंबेडकर हे मुळातच एक सच्चे देशभक्त होते. त्यामुळेच भारतीय एकात्मतेच्या आड येणाऱ्या सिंध प्रांत विभाजनाचा प्रश्न असो की मुस्लीम अनुनयाचे कॉंग्रेसी धोरण असो त्यावर ते परखडपणे बोलत राहिले. प्रसंगी देशभक्तांच्या मदतीला वकील म्हणून धावून गेले. आपल्याला नेमणूका देऊन ब्रिटीश सरकार माझा उपयोग देशाविरुध्द करणार असेल तर खबरदार असे सरकारला बजावणारे व ब्रिटनला जाऊन ब्रिटीशांनाच चालते व्हा म्हणणारे पहिले देशभक्त डॉ. आंबेडकर होत. संविधानाच्या माध्यमातून आपल्या भारत देशाच्या आधुनिकतेची पायाभरणी करणारे व त्याच संविधातील उद्दिष्टांना प्राणभूत करण्यासाठी आपल्याच मायभूमीतील बौध्द धम्माचा स्वीकार करुन भारताचे अखंडत्व व स्वातंत्र्य आबाधित राखणारे निस्सिम राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच होत.

***संदर्भ सूची***


*१. प्रा. जगन्नाथ कराडे, राष्ट्रवादी डॉ. आंबेडकर, सुमेध प्रकाशन, पूणे, जानेवारी २००७, पृ. २१*

*२. प्रा. डॉ. सी. एच. निकुंभे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद वास्तव आणि विपर्यास, सुगावा प्रकाशन पूणे, जुन २००८, पृ. १२*

*३. उमेश बगाडे, सत्यशोधक राष्ट्रवाद, प्रकाशक : किशोर ढमाले, कांतिसिंह नाना पाटिल अकादमी, जानेवारी १९९८, अहमदनगर, पृ. १-२*

*४. तत्रैव*

*५. तत्रैव*

*६. डॉ. निकुंभे पूर्वोक्त पृ. २९*

*७. तत्रैव*

*८. तत्रैव, पृ. १९*

*९. प्रा. कराडे, पूर्वोक्त, पृ. १८*

*१०. डॉ. निकुंभे, पूर्वोक्त, पृ. ६*

*११. तत्रैव*

*१२. डॉ. डी. आर. जाटव, राष्ट्रीय आन्दोलन मे डॉ. अम्बेडकर की भूमिका, समता साहित्य सदन प्रकाशन, जयपुर, १९९६, पृ. १२*

*१३. राजा जाधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्य चळवळ, राजलक्ष्मी प्रकाशन, मुंबई, एप्रिल १९९४, पृ. १३*

*१४. डॉ. निकुंभे, पूर्वोक्त, पृ. ६५*

*१५. तत्रैव पृ. ८६*

*१६. तत्रैव, पृ. ८९*

*१७. डॉ. यशवंत मनोहर, धम्म म्हणजे भारतीय संविधानाचे प्राणतत्वश (लेख), लोकराज्य, धम्मचक प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक आक्टोंबर २००६, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. १२२*

*१८. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, श्डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि राष्ट्रीय एकात्मता (लेख), लोकराज्य, पुर्वोक्त पृ. १८ व २०*


**ISBN 978-81-925424-0-9**